# धुळे महानगरपालिका,धुळे

मा.आयुक्त तथा प्रशासक
नगरसचिव कार्यालय

---

## प्रशासकीय महासभा क्रमांक २५

---

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि. २९/१२/२०२३ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीत अंतर्भुत केलेल्या कलम ४५२ अ (१अ) अन्वये मा.प्रशासक सो. यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार सर्वसाधारण महासभेसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर निर्णय घेणेसाठी **शुक्रवार दिनांक १०/१०/२०२५ सकाळी ११-३० वाजता स्व.दिलीप पायगुडे सभागृहात आयुक्त तथा प्रशासक श्रीमती अमिता दगडे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली** संपन्न झाली. सदर बैठकीचे इतिवृत्त

सदर सभेस खालील अधिकारी उपस्थित होते.

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १. | श्रीमती अमिता दगडे-पाटील | आयुक्त तथा प्रशासक |
| २. | श्रीमती करुणा डहाळे | अति. आयुक्त |
| ३. | श्रीमती शोभा बाविस्कर | उपायुक्त |
| ४. | श्री हेमंत निकम | उपायुक्त |
| ५. | श्रीमती स्वालिया मालगावे | करमुल्य निर्धारण तथा कर संलकन अधिकारी |
| ६. | श्री किशोर सुडके | सहा. आयुक्त |
| ७. | श्री शाहेद शेख मो. शेख | मुख्य लेखापरीक्षक |
| ८. | श्री बाळासाहेब तट्टु | मुख्य लेखाअधिकारी |
| ९. | श्री सुनिलकुमार सुर्यवंशी | उपमुख्यलेखापरीक्षक |
| १०. | श्री.मनोज वाघ | नगरसचिव |
| ११. | श्री प्रदीप चव्हाण | कार्य.अभियंता |
| १२. | श्री राजेंद्र माईनकर | प्र. भांडारपाल |
| १३. | श्री के.डी साबळे | लिपीक आस्थापना विभाग |
| १४. | श्री.चंद्रकांत उगले | उप अभियंता, पाणीपुरवठा विभाग |
| १५. | श्री एन.के. बागुल | उप अभियंता, विद्युत विभाग |
| १६. | श्री प्रकाश सोनवणे | उप अभियंता, नगररचना |
| १७. | श्री कमलेश सोनवणे | सहा. अभियंता नगररचना |
| १८. | श्री हेमंत पावटे | सहा. अभियंता बांधकाम |
| १९. | श्री उमेश पाटील | नगररचना विभाग |
| २०. | श्री मधुकर निकुंभे | मालमत्ता व कर विभाग |
| २१. | श्री प्रसाद जाधव | अतिक्रमण अधिक्षक |
| २२. | श्रीमती कल्पना जाधव | अभिलेखापाल |
| २३. | श्री रविकिरण पाटकरी | वृक्ष अधिकारी |
| २४. | श्री गणेश सुर्यवंशी | लिपीक शिक्षण मंडळ |
| २५. | श्रीमती मिना सातभाई | समाज विकास अधिकारी |
| २६. | श्री महेंद्र ठाकरे | मुख्य स्वच्छता निरीक्षक |
| २७. | श्री राजेश वसावे | मुख्य स्वच्छता निरीक्षक |
| २८. | लक्ष्मण पाटील | मुख्य स्वच्छता निरीक्षक |

मा.नगरसचिव — वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

**मा.प्रशासक:-** — आजच्या सभेचे कामकाजास सुरूवात करण्यात यावे.

# सदर बैठकीत पारीत झालेले ठराव व प्रस्ताव

---

**प्रशासक ठराव क्र.१९८** **दिनांक:-१०/१०/२०२५**

---

**वाचा:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/ नवि१४ दि.२९/१२/२०२३ अन्वये

२. विभाग प्रमुख यांचे कडील प्रस्ताव जा.क्र.धुमपा/ न.र./ २८७ दिनांक ०१/१०/२०२५

विषय क्रमांक:-१९८ महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २१(३) अन्वये प्रारुप विकास योजना राज्यशासनास मंजूरीस्तव सादर करण्यासाठी मुदतवाढ मिळणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

---

वाचा क्र.०१ व उप अभियंता, नगररचना विभाग यांचा वाचा क्रमांक २ चा प्रस्ताव तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदी नुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे “उक्त अधिनियम” असे संबोधिलेले आहे) चे कलम २१(२) मधील तरतुदीनुसार धुळे महानगरपालिकेची हद्दवाढ झाल्याच्या दिनांकापासून तीन वर्षाच्या आत किंवा राज्य शासनाने वेळोवेळी वाढवून दिलेल्या मुदतीत वैधानिक कार्यवाही करून प्रारूप विकास योजना शासनास मंजूरीस्तव सादर करणे आवश्यक आहे.धुळे महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीतील क्षेत्राची प्रारुप विकास योजना राज्य शासनाकडे मंजुरीसाठी सादर करण्याकरीताची मुदत दि. ०१.०४.२०२२ ते दि. २८.०२.२०२५ पर्यंत वाढविण्यात आली होती.

सदर मुदतवाढ कालावधीत विविध आचारसंहिता अंमलात असल्याने उक्त अधिनियमाचे कलम १४८(अ) अन्वये वगळायचा कालावधी विचारात घेता मंजूर मुदतवाढीचा कालावधी दि .०९.०९.२०२५ पर्यंत परीगणित होत असल्याचे कळविण्यात आले आहे.

प्रारुप विकास योजना उक्त अधिनियमाचे कलम २६(१)अन्वये दि.१५.०५.२०२५ रोजी प्रसिद्ध झाली असून,उक्त अधिनियमाचे कलम २८(३) अन्वयेप्रारूप विकास योजनेवर प्राप्त हरकतीसूचनांवर नियोजन / महानगरपालिकेस अहवाल सादर करण्याची समितीकडून निर्णय घेऊन धुळे मुदत दि.१८.१०.२०२५अशी आहे.तसेच, उक्त अधिनियमाचे कलम ३०अन्वये प्रारुप विकास योजना राज्यशासनाकडे मंजुरीसाठी सादर करण्याची कालमर्यादा विचारात घेता,कलम २१(२)अन्वयेची कार्यवाही दि.०९.०९.२०२५ पर्यंत पूर्ण होणार नाही .

त्यामुळे दि .०१.०३.२०२५ ते दि .१५.०३.२०२६ पर्यंतच्या कालावधीसाठी प्रारुप विकास योजना शासनास मंजूरीस्तव सादर करण्यासाठी उक्त अधिनियमाचे कलम २१(३) अन्वये मुदतवाढ देणेसाठी सदर बाब धोरणात्मक असल्याने सदर विषय म. महासभेसमोर सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेता, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २१(३) अन्वये प्रारुप विकास योजना राज्यशासनास मंजूरीस्तव सादर करण्यासाठी मार्च २०२६ पावेतो मुदतवाढ देण्यास मान्यता देणेत येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/-x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

---

**प्रशासक ठराव क्र.१९९** **दिनांक:-१०/१०/२०२५**

---

**वाचा:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/ नवि१४ दि.२९/१२/२०२३ अन्वये

२. विभाग प्रमुख यांचे कडील प्रस्ताव जा.क्र.धुमपा/ आस्था. / ८८१ दिनांक ०३/१०/२०२५

विषय क्रमांक:-१९९ धुळे महानगरपालिकेतील कार्यकारी अभियंता, तांत्रिक सेवा, श्रेणी १ चे पदावरश्री.प्रदिप चव्हाण यांना दिलेल्या पदोन्नतीस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५३ (१) नुसार मंजूरीस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

---

वाचा क्र.०१ व कार्या अधिक्षक, आस्थापना विभाग यांचा वाचा क्रमांक २ चा प्रस्ताव तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदी नुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

धुळे महानगरपालिकेच्या मंजूर आकृतीबंधानुसार **कार्यकारी अभियंता (पा.पु.)** या संवर्गातील ०२ पदे मंजूर आहेत.धुळे महानगरपालिका मुख्य सेवा प्रवेश नियम, २०१६ व धुळे महानगरपालिकेसाठी सुधारित सेवा प्रवेश नियम, २०२२ मंजूर असून सुधारित सेवाप्रवेश नियमानुसार कार्यकारी अभियंता चे ०१ पद पदोन्नतीने भरणेबाबत नमूद आहे.

सद्यस्थितीत धुळे महानगरपालिकेतील कार्यकारी अभियंता (स्थापत्य) नामनिर्देशनाच्या रिक्त पदावर श्री.नवनीत सोनवणे, कार्यकारी अभियंता व पदोन्नतीच्या कोट्यातील रिक्त पदावर श्रीमती वर्षा घुगरी, कार्यकारी अभियंता हे प्रतिनियुक्तीने कार्यरत आहेत.शासन निर्णयानुसार पदोन्नती प्रस्ताव सादर केलेला असून सदर शासन निर्णयातील आवश्यक पात्रतेनुसार सेवाजेष्ठता, गोपनीय अहवाल, मत्ता व दायित्व इ. बाबत छाननी तक्ता समितीपुढे सादर करण्यात आले.एकूण ०१ पात्र अधिकारी **कार्यकारी अभियंता (पा.पु.)** या पदावर पदोन्नती देण्याबाबतचा विषय पदोन्त्ती समितीपुढे सादर करण्यात आलेला होता.दिनांक – ३०/०९/२०२५ रोजी पदोन्नती समितीची बैठक संपन्न झाली व सदर बैठकीच्या इतिवृत्तास मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे.

त्याअनुषंगाने श्री.प्रदीप दत्तात्रय चव्हाण, उप अभियंता (पा.पु.) यांना पा.पु. विभागातील पदोन्नतीच्या कोट्यातील मंजूर असलेल्या **कार्यकारी अभियंता (पा.पु.)** या पदावर S-२३: ६७७००-२०८७०० या वेतनश्रेणीमध्ये, खुल्या प्रवर्गातून आदेशात नमूद अटी व शर्तीस अधीन राहून तात्पुरती पदोन्नती देण्यात आलेली आहे.

तरी उक्तप्रमाणे प्रस्तावास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ५३ (१) नुसार मान्यता देणेबाबत सदरचा विषय मे.महासभेपुढे मान्यतेस्तव सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार व प्रस्तावानुसार, धुळे महानगरपालिकेतील कार्यकारी अभियंता, तांत्रिक सेवा, श्रेणी १ चे पदावरश्री.प्रदिप चव्हाण यांना दिलेल्या पदोन्नतीस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५३ (१) नुसार मान्यता देणेत येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/-x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

---

**प्रशासक ठराव क्र.२००** **दिनांक:-१०/१०/२०२५**

---

**वाचा:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/ नवि१४ दि.२९/१२/२०२३ अन्वये
२. विभाग प्रमुख यांचे कडील प्रस्ताव जा.क्र.धुमपा/ आस्था./८८० दिनांक ०३/१०/२०२५

विषय क्रमांक:-२०० धुळे महानगरपालिकेतील समाज विकास अधिकारी, प्रशासकीय सेवा, श्रेणी २ चे पदावर सौ. मिना सातभाई यांना दिलेल्या पदोन्नतीस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५३ (१) नुसार मंजूरीस्तव आलेल्या कार्यालयीन अहवलावर निर्णय घेणे.

---

वाचा क्र.०१ व कार्या अधिक्षक, आस्थापना विभाग यांचा वाचा क्रमांक २ चा प्रस्ताव तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदी नुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

धुळे महानगरपालिकेच्या मंजूर आकृतीबंधानुसार **समाज विकास अधिकारी, प्रशासकीय सेवा, श्रेणी - २** या संवर्गातील ०१ पद मंजूर व रिक्त होते.धुळे महानगरपालिका मुख्य सेवा प्रवेश नियम, २०१६ व धुळे महानगरपालिकेसाठी सुधारित सेवा प्रवेश नियम, २०२२ मंजूर असून सुधारित सेवाप्रवेश नियमानुसार सदरचे पद पदोन्नतीने भरणेबाबत नमूद आहे.

शासन निर्णयानुसार पदोन्नती प्रस्ताव सादर केलेला असून सदर शासन निर्णयातील आवश्यक पात्रतेनुसार सेवाजेष्ठता, गोपनीय अहवाल, मत्ता व दायित्व इ. बाबत छाननी तक्ता समितीपुढे सादर केलेला होता.श्रीमती मीना योगेश सातभाई, प्रभारी अधिक्षक तथा वरिष्ठ सहाय्यक **समाज विकास अधिकारी** या पदावर पदोन्नती देण्याबाबतचा विषय पदोन्ती समितीपुढे सादर करण्यात आलेला होता.

दिनांक – ३०/०९/२०२५ रोजी पदोन्नती समितीची बैठक संपन्न झाली व सदर बैठकीच्या इतिवृत्तास मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे.

त्याअनुषंगाने श्रीमती मीना योगेश सातभाई, प्रभारी अधिक्षक तथा वरिष्ठ सहाय्यक यांना शैक्षणिक अर्हता व निम्न पदावर कार्यरत असतांना धारण केलेल्या अधिक्षक व समकक्ष पदाच्या अनुभवानुसार महिला व बालकल्याण विभागातील पदोन्नतीच्या कोट्यातील मंजूर व रिक्त असलेल्या **समाज विकास अधिकारी, प्रशासकीय सेवा, श्रेणी - २** या पदावर S-१५: ४१८००-१३२३०० या वेतनश्रेणीमध्ये, खुल्या प्रवर्गातून आदेशात नमूद अटी व शर्तीस अधीन राहून तात्पुरती पदोन्नती देण्यात आलेली आहे.

तरी उक्तप्रमाणे प्रस्तावास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ५३ (१) नुसार मान्यता देणेबाबत सदरचा विषय मे.महासभेपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार व प्रस्तावानुसार, धुळे महानगरपालिकेतील समाज विकास अधिकारी, प्रशासकीय सेवा, श्रेणी २ चे पदावर सौ. मिना सातभाई यांना दिलेल्या पदोन्नतीस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५३ (१) नुसार मान्यता देणेत येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/-x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

---

**प्रशासक ठराव क्र.२०१** **दिनांक:-१०/१०/२०२५**

---

**वाचा:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/ नवि१४ दि.२९/१२/२०२३ अन्वये

२. विभाग प्रमुख यांचे कडील प्रस्ताव जा.क्र.धुमपा/ बां.वि. / ९५ दिनांक ०६/१०/२०२५

विषय क्रमांक:-२०१ धुळे मनपा आर्किटेक्ट पॅनलवर मे. चावरे असोसिएटस, आर्किटेक्ट नाशिक यांची नियुक्ती करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

---

वाचा क्र.०१ व कार्य. अभियंता, बांधकाम विभाग यांचा वाचा क्रमांक २ चा प्रस्ताव तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदी नुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

मे. चावरे असोसिएट्स, आर्कीटेक्ट नाशिक हि फर्म आर्कटिक्ट व्यवसायात कार्यरत असून सदर फर्म शासकीय निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थासाठी कामे करीत असल्याने धुळे महानगरपालिकेत आर्कीटेक्ट म्हणून काम करणेसाठी उत्सुक असल्याने त्यांनी धुळे मनपा आर्कीटेक्ट पॅनलवर आर्कीटेक्ट म्हणून नियुक्त करणे बाबत विनंती केली आहे. धुळे मनपाच्या आर्कीटेक्ट पॅनलवर आर्कीटेक्ट म्हणून नेमणूक करणे कामी मे. महासभेची मंजुरी आवश्यक असल्याने सदरचा विषय मे. महासभेपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार व प्रस्तावानुसार, धुळे मनपा आर्किटेक्ट पॅनलवर मे. चावरे असोसिएटस, आर्किटेक्ट नाशिक यांची शासननिर्णय क्रमांक संकीर्ण २०१८/प्र.क्र./५४/नवि-१६ दिनांक ०४ जुन २०१८ मधील दरास अधिन राहून नियुक्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच मे. उच्च न्यायालय तथा मे. सर्वोच्च न्यायालयात अत्यावश्यक याचिकेप्रसंगी जेष्ठ विधीतज्ञ (सिनियर कौन्सिल) नियुक्त करणे आवश्यक असते. यास्तव अशा प्रसंगी जेष्ठ विधीतज्ञ (सिनियर कौन्सिल) नियुक्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/-x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**